लोकमत

# ज्येष्ठांना ३ हजारांचे अर्थसाहाय्य; 'वयोश्री'साठी अर्ज केला का?

## चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हीलचेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्चीसाठी मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक साहाय्य साधने, उपकरणे खरेदी करण्याकरिता, तसेच मन:स्वास्थ्य केंद्र, योगोपचार केंद्र इत्यादीद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी राज्यात 'मुख्यमंत्री वयोश्री' योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना ३ हजार रुपयांचे अर्थसाहाय्य केले जाते.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न २ लाख रुपयांच्या आत असावे, तसेच मागील तीन वर्षांत स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारद्वारे उपरोक्त उपकरणे घेतलेली नसावीत याबाबतचे लाभार्थ्याने स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांना आधार कार्ड, मतदान कार्ड, राष्ट्रीयीकृत बँकेची बँक पासबुक झेरॉक्स, पासपोर्ट आकाराचे २ फोटो, स्वयंघोषणापत्र, शासनाने ओळखपत्र पटविण्यासाठी विहित केलेली कागदपत्रे इत्यादीची आवश्यकता आहे.

### काय आहे मुख्यमंत्री वयोश्री योजना?

या योजनेअंतर्गत पात्र वृद्ध लाभार्थ्यांना त्यांच्या शारीरिक असमर्थता, दुर्बलतेनुसार चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हीलचेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नी-ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर इ. साहाय्य साधने, उपकरणे खरेदी करण्याकरिता, तसेच मन:स्वास्थ्य केंद्र, योगोपचार केंद्र इ. द्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी मुख्यमंत्री वयोश्री योजनेअंतर्गत पात्र वृद्ध लाभार्थ्यांना थेट धनादेशाद्वारे एक वेळ एकरकमी ३ हजार रुपयांचा लाभ प्रदान करण्यात येतो.

### कोण आहे पात्र?

महाराष्ट्राचा रहिवासी, ६५ वर्षे वय किंवा त्यापेक्षा अधिक, लाभार्थ्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न २ लाख रुपयांच्या आत असावे.

### काय लाभ मिळतो?

दुर्बलतेनुसार चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हीलचेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नी-ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर इत्यादी साहाय्य साधने, उपकरणे.



### कागदपत्रे काय लागतात?

आधार कार्ड, पासपोर्ट साइज फोटो, मोबाइल नंबर, उत्पन्न प्रमाणपत्र, रेशन कार्ड, मतदान कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स, पासपोर्ट आकाराचे २ फोटो, स्वयंघोषणापत्र, शासनाने ओळखपत्र पटविण्यासाठी विहित केलेली कागदपत्रे.

### संपर्क साधा

सहायक आयुक्त समाजकल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन आयटीआयसमोर दीक्षाभूमी रोड, नागपूर

> वयोमानानुसार अपंगत्व किंवा अशक्तपणा आलेल्या वयोवृद्ध नागरिकांसाठी असलेली ही अतिशय चांगली योजना आहे. नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने याचा लाभ घ्यावा.
>
> **डॉ. सिद्धार्थ गायकवाड,** प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, नागपूर